FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नागपुर शहर **P.S.(ठाणे):** सदर
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0674 **Year (वर्ष):** 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 13/11/2026 11:30

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 12/11/2026
Date To (दिनांक पर्यंत): 12/11/2026
Time From (वेळेपासून): 12:40 बजे
Time To (वेळेपर्यंत): 17:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक): 12/11/2026 **Time (वेळ):** 18:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 005
Date & Time (दिनांक आणि वेळ): 13/11/2026 04:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** नागपूर महानगर पालीका , नागपूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सर तर्फे राहुल धर्मसिंग चव्हाण पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपुर,सदर,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपुर,सदर,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8888092427

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	श्री.गौरव राजू वानखेडे			1. पद कर सग्रहक,रेकॉंड,सेक्षन नागपूर महानगर ,पालीका नागपूर,सदर,नागपुर शहर, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तात्काळ

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान	मोबाईल फोन	अंगझडती दरम्यान जप्त केलेला Realme UI7.0 कंपनीचा पांढया रंगाचा ज्यावर चंदेरीसोनेरी रंगाच्या रेघा अ	0.00
2	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	आरोपी याने तक्रारदार याचे कडुन स्विकारलेली लाच रक्कम एकुण 1,000/ रुपये	0.00
3	इतर	संकीर्ण/विविध	सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान रेकार्ड झालेले संभाशण असलेले मेमोरी कार्ड	0.00
4	इतर	संकीर्ण/विविध	सापळा कार्यवाही दरम्यान व्हिडीओ रेकॉर्डींग दरम्यान वापरण्यात आलेला मेमोरी कार्ड	0.00
5	इतर	संकीर्ण/विविध	आलोसे यांच्या कार्यालयातील टेबला वरून जप्त केलेलाCASIO MJ12D 12 DIGITS कंपनीचा राखळी रंगाचा ज्याव	0.00
6	इतर	संकीर्ण/विविध	आलोसे यांच्या कार्यालयातील टेबला वरून जप्त केलेले तक्रारदार यांनी 1) अभिलेखाच्या प्रामाणित सत्य प्रत	0.00

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

0.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

माझे नाव:- राहुल धर्मसिंग चव्हाण, वय 46 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर, मोनं 8888092427

समक्ष पोलीस स्टेशन सदर,नागपूर षहर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की; मी मागील 6 महिण्यापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर येथे कार्यरत आहे.

आम्ही दिनांक 12/11/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय प्रषासकिय ईमारत क्र. 1, दुसरा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे हजर असतांना श्री. महेष भोरटेकर, पोलीस उप अधिक्षक, यांनी आम्हाला बोलाविले. त्यावरून आम्ही पोलीस अधीक्षक कार्यालय, ला.प्र.वि. नागपूर येथे येवून श्री.महेश भोरटेकर, पोलीस उप अधिक्षक यांना भेटलो असता त्यांचे कक्षात एक व्यक्ती बसुन होते. श्री.महेष भोरटेकर यांनी त्यांचे कक्षात हजर असलेल्या व्यक्तीस आमचा परिचय करून दिला व त्या व्यक्तीचा परिचय आम्हास श्री. रामेष्वर लक्ष्मणराव नंदनवार, वय 62 वर्ष असा करून दिला. श्री.महेश भोरटेकर यांनी आम्हास सांगितले की, श्री. रामेष्वर लक्ष्मणराव नंदनवार यांची एका लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणी संबंधाने तक्रार आहे. त्यांना तुमचे कक्षामध्ये घेवून जावून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करा असे मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांनी आदेषित केले आहे. त्यावरुन श्री. रामेश्वर लक्ष्मणराव नंदनवार यांना आम्ही आमचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रशासकिय ईमारत

क्र. 1, चौथा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे सोबत घेवून आलोत. तक्रारदार श्री. रामेष्वर लक्ष्मणराव नंदनवार, वय 62 वर्ष, व्यवसाय - सेवानिवृत्त कर्मचारी,नागपूर महानगर पालीका नागपूर. रा. घर क्र 617-अ, वार्ड नं 50 भानखेडा, टिमकी दादरा पुलाजवळ, नागपूरहे वेळ अंदाजे 12.40 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रषासकिय ईमारत क्र. 1, चौथा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर कार्यालयात हजर आले व त्यांनी आम्हास एका लोकसेवकांविरूध्द तक्रार असल्याचे सांगुन त्यांनी त्यांची हस्तलिखीत तक्रार सादर केली व ती आम्ही टंकलिखीत करुन घेतली सदर हस्तलिखीत व टंकलिखीत तक्रारीवर त्यांनी व आम्ही समक्ष म्हणून सही केली.

तक्रारदार यांचे तक्रारीनुसार आम्ही व पथक तसेच षासकीय पंचासह दि. 12/11/2026 रोजी तक्रारदार यांना गैरअर्जदार श्री.गौरव हे तक्रारदार यांचे जमाबंदीची रेकॉर्ड प्राप्त करण्यासंबधाने लाच मागणी करतात किंवा कसे याकरीता पडताळणी करणे आवष्यक आहे असे सर्वानुमते ठरले तसेच पंच क्र.01 श्री. संजय लक्ष्मण लोखंडे यांना तक्रारदार श्री.रामेश्वर नंदनवार यांची भेट घेण्याकरीता पाठविण्यात येणार असल्याचे आम्ही सांगीतले. त्याप्रमाणे तक्रारदार यांची अंगझडती पंचनामा करून पोलीस अंमलदार प्रफुल भातुलकर यांना ''सोनी''(मॉडेल क्र. ICD-PX470) कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 5411XV8711YY BM व्हाईस रीकॉर्डर सुरू करून पंच क्र.1 यांचे आवाजात मॅगन्टेगिक सिल करून तक्रार यांचे गळयात दोरीच्या सहाय्याने शर्टाच्या आतुन लटकविले व तक्रारदार आणि पंच यांना तक्रारदार यांचे दुचाकीने गै.अ. गौरव वानखेडे यांचेकडे पडताळणी करीता वेळ 15.43 वा तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने पंच क्र. 1 सह गैरअर्जदार यांचे लाच मागणी पडताळणी करीता नागपूर महानगर पालीका,नागपूर सिव्हील लाईन नागपूर येथे रवाना करण्यात आले. आम्ही सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र. 02 व्हि.सी.ए ग्राउन्ड चे पाठीमागे सिव्हील लाईन नागपूर येथे तक्रारदार व पंच क्र. 1 यांची परत येण्याची वाट पाहत थांबुन राहीलो.त्

यानंतर तक्रारदार श्री. रामेष्वर लक्ष्मणराव नंदनवार व पंच क्र. 1 श्री. संजय लक्ष्मणराव लोखंडे हे तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी व्हि.सी.ए ग्राउन्डड चे पाठीमागे सिव्हील लाईन नागपूर येथे वेळ 15.57 वा. परत आले. तक्रारदार यांचेकडून आमचे सुचनेप्रमाणे पथकातील सदस्य पो.षि. प्रफुल भातुलकर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये पडताळणीवरून परत आल्याबाबत पंच क्र. 1 यांचा आवाज रेकॉर्ड करून वेळ सुमारे 15.58 वाजता रेकॉर्डर बंद केला. यानंतर आम्ही, पंच क्र. श्री. संजय लक्ष्मणराव लोखंडे यांना तक्रारदार श्री. रामेश्वर नंदनवार व गै.अ.श्री. गौरव यांच्यात लाच पडताळणी दरम्यान झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, मी तक्रारदारासोबत त्यांच्या दुचाकी वाहनाने गै.अ.श्री. गौरव यांचे लाच मागणी पडताळणी करीता त्यांचे नागपूर महानगर पालीका,नागपूर सिव्हील लाईन येथील दुस-या माळयावरील रेकॉर्ड सेक्षन येथील त्यांचे कार्यालयात गेलो असता तक्रारदार यांने मला समोर बसलेला व्यक्ती हा गौरव असल्याचे सांगीतले. मी व तक्रारदार असे दोघेही गैरअर्जदार यांचे कडे गेलो असता गैरअर्जदार यांने तक्रारदार यास '' त्यांचे राहते घराचे घराचे जमाबंदी रेकॉर्ड संबधाने बोलणी केली तेव्हा गैरअर्जदार यांने सध्या सुटया असल्याने व त्यांचेकडे जास्त काम असल्याने काम लवकर होवु शकत नाही तेव्हा तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना लवकर काम करुन दया मला अंत्यत आवशस्यकता आहे असे बोलल्यावर गैरअर्जदार यांनी कार्यालयातील दुस-या कर्मचा-याकडुन कॅल्युकेटर घेवुन त्यावर तक्रारदार यांना कॅल्युकेलेटरवर पहिले 2500 असे लिहुण दाखविले त्यावर तक्रारदार यांनी नाही सर मी गरीब माणुस आहे बरोबर करुन दया मला अर्जन्ट आहे त्यावर गैरअर्जदार यांनी नाही मला बरेच काम आहेत तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना विनंती केली असता गैरअर्जदार यांनी ठिक आहे तुमच्या हिषोबान करा असे बोलल्याने तक्रारदार यांनी त्यांना ठिक आहे 2000 हजार रुपये आणुन देतो ए.टी.एम मधुन'' असे बोलुण आम्ही दोघेही तक्रारदारासह आपण थांबुन असलेल्या या ठिकाणी परत आलो व माझे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर बंद केला आहे असे कथन केले. त्यानंतर आम्ही तक्रारदारास घडलेल्या घटनाक्रमाविषयी विचारले असता, त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली वरील हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. तसेच तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांचे पुर्ण नाव गौरव वानखेडे असल्याचे आम्हास पंचासमक्ष सांगीतले.

गैरअर्जदार श्री. गौरव वानखेडे यांनी लाचेची मागणी केल्याने सापळा कार्यवाही लवकरात लवकर करणेबाबत विनंती केली. तक्रारदार यांचे विनंतीप्रमाणे तक्रारदार यांना सापळा कार्यवाही करीता गैरअर्जदार यांचे नागपूर महानगर पालीका,नागपूर येथे पंचासह पाठविण्याकरीता सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार परत आल्यावर त्यांची पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेण्यात आली. झालेल्या पडताळणी संबधाने पंचासमक्ष सक्रीप्ट तयार करण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाचरक्कम 500 रू. दराच्या 2 चलनी नोटा असे 1,000/- रुपये तक्रारीप्रमाणे लाचरक्कम देण्याचे योजिले होते परंतु सापळा पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार यांनी तडजोडअंती 2000/-रु ची मागणी केली पंरतु तक्रारदार यांनी पंचासमक्ष मी तक्रार देते वेळी दिलेले 1000/- रुपयेच दया मी गैरअर्जदार यास 1000/-रु देतो व उर्वरीत रक्कम नंतर देतो असे सांगुण देईल अषी पंचासमक्ष

आम्हास विनंती केल्याने आम्ही आमचे ट्रॅपबॅगमधील 500 रुपये दराच्या 2 नोटा असे एकुण 1,000/-रु पंच क्रमांक 2 यांनी आपले उजवे हाताने घेवुन तक्रारदार यांच्या षर्टच्या डाव्या खिषात ठेवले व पंच क्र. 2 यांनी बाँटल मधील पाण्याने हात स्वच्छ धुवुन घेतले. तसेच तक्रारदार व पंचाना सुचना देण्यात आल्या तसेच तक्रारदार यांना लाच स्वीकारल्याचा इषारा म्हणुन त्यांचेजवळी पांढरा रुमाल काढुण डोक्यावरुन फिरविण्याबाबतचा ईषारा करणे बाबत सुचना दिली.

आमचे सुचनेवरून सापळा पथकातील सदस्य पो.अं.प्रफुल भातुलकर यांनी सोनी कंपनीचे माँडेल क्र. ICD-PX 470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये असलेले SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 5411XV8711YY BM वर्नणाचे मेमोरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन पंच क्र. 1 यांचे आवाजात मॅगन्टेगिक सिलकरून व व्हाईस रीकॉर्डर तक्रारदार यांचे षर्टच्या आत मध्ये गळयात दोरीच्या सहाय्याने लटकवुन व पंच क्र.01 सह तक्रार यांचे गैरअर्जदार यांचे नागपूर महानगर पालीका नागपूर सिव्हील लाईन, नागपूर येथे तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने वेळ 16.34 वा पाठविण्यात आले. त्यांचे मागोमाग आम्ही, पोहवा भरत ठाकुर, प्रफुल भातुलकर, पो.हवा आषीश वैदय, पो.शि मिलींद मेश्राम,पोषि संदेष रामटेके असे षासकिय वाहनाने चापोशि. सदानंद सिरसाट असे नागपूर महानगर पालीका,नागपूर येथे जाण्याकरीता रवाना झालो. आम्ही गैरअर्जदार यांचे नागपूर महानगर पालीका,नागपूर येथील दुस-या माळयावरील गैरअर्जदार यांचे कार्यालयाचे आवारात जावुन कोणालाही संशय येणार नाही अश्या ठिकाणी थांबुन राहीलो. वेळ 17.00 वा. तक्रारदार हे गैरअर्जदार यांचे कार्यालयाचे बाहेर निघुन त्यांचेकडील पांढरा रुमाल काढुण डोक्यावरुन फिरवुन आत मध्ये गेले. तक्रारदार यांचा नियोजित इषारा होताच आम्ही पंच क्र. 2 व स्टाफसह तात्काळ गैरअर्जदार यांचे कॅबिनकडे ट्रॅप बॅग व इतर साहित्यासह गेलो. आम्ही गैरअर्जदार यांचे कॅबिनमध्ये गेलो असता तिथे तक्रारदार, पंच क्रमांक 1 असे हजर होते. तेव्हा आम्ही पंच क्रमांक 1 यांना गैरअर्जदाराबाबत विचारपूस केली असता त्यांनी समोर बसलेल्या ईसमाकडे ईषार करुन हेच गैरअर्जदार गौरव वानखेडे असल्याचे सांगीतले. वरुन आम्ही गैरअर्जदार यांना आमचा परिचय देवुन सापळा कार्यवाहीबाबत आमचा उद्देष सांगुन सांगीतला व पुढील कार्यवाहीकरीता सहकार्य करण्याबाबत सांगीतले. सदर गैरअर्जदार यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव गौरव राजु वानखेडे वय 25 वर्ष पद- कर संग्रहक, रेकॉर्ड सेक्षन,नागपूर महानगर पालीका नागपूर असे सांगीतले.

त्यानंतर सापळा कार्यवाहीबाबत प्रात्यक्षिक प्रमाणे गैरअर्जदार यांनी लाच स्विकारल्याबाबत अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्रा व्हायलेट लॅम्पच्या सहाय्याने पाहणी करणेकरीता आमचे सुचनेवरुन पो.षि.संदेष रामटेके यांनी त्याचे ताब्यातील सॅमसंग गॅलक्सी ए 17 या मोबाईल मध्ये एक नविन मेमोरीकार्ड क्र. SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 5411XV8711YY BM हा टाकुन लोकेषन एस.डी.कार्ड अषी मोबाईलमध्ये सेटींग करुन कार्यवाहीकरीता व्हिडीओ रेकॉर्डींग सुरु केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली आणि कुठे ठेवली याबाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, '' त्यांनी लाच रक्कम त्यांचे षर्ट मधील डाव्या खिष्यातुन काढुन त्यांचे उजव्या हाताने गैरअर्जदार गौरव वानखेडे यांना दिली व त्यांनी ती रक्कम माझे कडुन डाव्या हाताने घेवुन आपल्या लाकडी टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवली '' असे सांगीतले. त्यामुळे आम्ही व दोन्ही पंचांना घेवुन गैरअर्जदार श्री. गौरव वानखेडे यांनी सदरची लाच रक्कम आपल्या समोरील लाकडी टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवली असल्याने आम्ही नमुद ड्राव्हरची तपासणी केली असता ड्राव्हर मध्ये लाच रक्कम मिळुण आली. गैरअर्जदार पळून जावू नये याकरिता सापळा पार्टी सदस्य यांना सतर्कतेबाबत सुचना देण्यात आल्या. यानंतर आमचे सुचनेवरून पंच क्र. 2 यांनी गैरअर्जदार गौरव वानखेडे यांनी त्यांचे कार्यालयीन टेबलचे डाव्वर मध्ये ठेवलेली लाच रक्कम ही तक्रारदार यांनी तक्रार देतेवेळी सादर केलेली रक्कम हिच आहे किंवा कूसे? याबाबत खात्री करण्यास सांगीतले. पंच क्र 2 यं

त्यांनी तिच लाच रक्कम असल्याची खात्री केल्यानंतर सापळा पार्टीतील सदस्य पोहवा भरत ठाकूर यांनी टॅप बॅग मधुन अल्ट्राव्हायलेट दिवा व काळा कपडा बाहेर काढून आमचेजवळ दिला. त्यानंतर आमचे सुचनेवरून गै.अ यांचे कक्षामधील लाईट बंद केले. काळया रंगाच्या कापडयाने गै.अ यांचे ताब्यातील कार्यालयीन टेबलचे ड्रावर मध्ये ठेवली असलेली लाच रक्कम पंच क्र. 2 यांचे हस्ते बाहेर काढुन लाचेच्या नोटवर अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात तपासली असता, सदर नोटवर व टेबलचे ड्रावरचे आतील भागावर निळसर रंगाची चकाकी दिसुन आल्याचे आमचे व दोन्ही पंचाचे निदर्षनास आले. तसेच तक्रारदार यांचे दोन्ही हात चेक केले असता त्यांच्या डाव्या हाताचे तळहातावर निळसर रंगाची चकाकी दिसुन आल्याचे आमचे व दोन्ही पंचाचे निदर्षनास आले. त्यांनतर लाच रक्कमपंच क्र. 2 यांना ताब्यात घेण्यास सांगून त्यातील नोट मोजण्यास सांगीतले असता, त्यांत 500/- रूपये दराची 2 चलनी नोटा मिळून आले. सदर लाच रक्कम ताब्यात घेण्यात आली.त्यानंतर आम्ही आमचे दोन्ही पंच व सापळा पथकातील हजर असलेले सर्व सदस्यांचे कॅबीनमध्ये अंधार करून अल्ट्राव्हाईलेट लॅम्पचे प्रकाषात तपासले

असता कोणाचेही हातावर हिरवटसर रंगाची चकाकी दिसुन आली नसल्याची गैरअर्जदार यांना खात्री करून दिली. त्यानंतर तक्रारदार यांचेकडील व्हॉईसरेकॉर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजात आमचे सुचनेवरुन पोलीस षिपाई प्रफुल भातुलकर यांनी वेळ 17/12 वा. बंद केला.

त्यानंतर गै.अ यांचे कक्षामधील प्रकाष पुर्ववत करण्यात आला. गैरअर्जदार गौरव वानखेडे यांचे कार्यालयीन टेबलावर कोरा कागदावर लाच रक्कमेतील नोट ठेवून नोटचे क्रमांक पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी प्रात्याक्षीक पंचनामा क्र. 1 मधील नमुद नोटच्या क्रमांकाषी जुळवुन पाहीले असता त्या नोटचे क्रमांक प्रात्यक्षिक पंचनामा क्र. 1 मध्ये नमुद नोटचे क्रमांकाषी तंतोतंत जुळुन आल्याने नमुद लाचरक्कम एका हिरव्या रंगाच्या लिफाप्यात सिलबंद करून सुरक्षीत ठेवण्यात आली. तसेच नमुद नोटचे तपषील असलेले लेबल ज्यावर गै.अ. गौरव वानखेडे, आमची व दोन्ही पचाची स्वाक्षरी घेण्यात आली. त्याचप्रमाणे नमुद नोट ठेवून असलेल्या लिफाप्याचे विवरणाचे जप्तीपत्रक तयार करून त्यावर आमची, दोन्ही पंचाची व गै.अ गौरव वानखेडे यांची स्वाक्षरी घेण्यात आली. तसेच गै.अ गौरव वानखेड यांची अंगझडती यादी टंकलिखीत तयार करून त्यांचेजवळ असलेल्या सर्व चिज वस्तू व रोख रक्कम मोबाईल फोन वगळुण वेळीच परत करून त्यांची स्वाक्षरी घेवून आम्ही व दोन्ही पंचानी अंगझडती यादीवर स्वाक्षरी केली. तसेच गैरअर्जदार यांचा जुना वापरता रियल मी कंपनीचा मोबाईल फोन ताब्यात घेवुन स्वतंत्र वेगवेगळ्या जप्तीपत्रका प्रमाणे जप्त करुन सिलबंद करण्यात आले असुन त्याला प्रदर्ष ड अषी निषानी देण्यात आली.

तसेच गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांना सापळा पडताळणी दरम्यान कॅलक्युलेटरवर 2500 असे आकडा लिहुण दाखविला असल्याने त्याबाबत पंचासमक्ष गैरअर्जदार यांना नमुद कॅलक्युलेटर बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे टेबल वर ठेवुन असलेला कॅलक्युलेटर पंचासमक्ष आमचे कडे दिला आम्ही नमुद कॅलक्युलेटरची पाहणी केली असता नमुद कॅलक्युलेटर हा CASIO MJ12D 12 DIGITS कंपनीचा राखळी रंगाचा ज्यावर ईग्रजी मध्ये अंक व षब्द लिहुण असलेला कॅलक्युलेटर असुन तो पंचासमक्ष पुराव्याकामी स्वतंत्र वेगवेगळ्या जप्तीपत्रका प्रमाणे जप्त करुन सिलबंद करण्यात आले असुन त्याला प्रदर्ष ब् अषी निषानी देण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांची सापळा कार्यवाही नंतरची अंगझडती यादी तयार करुन त्यांचेजवळ सापळा कार्यवाही पूर्वी असलेल्या चिज वस्तू व रोख रक्कम बरोबर असल्याचे दिसून आले. त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली. तसेच तक्रारदार यांनी त्यांच्या सर्व वस्तू परत मिळाल्याची स्वाक्षरी केली.

त्यानंतर आम्ही पंच क्र 1 यांना तक्रारदार यांचेसोबत गै.अ गौरव वानखेडे यांना लाच रक्कम देण्याकरीता त्यांचे कार्यालय नागपूर महानगर पालीका नागपूर सिव्हील लाईन, नागपूर येथे गेल्यावर काय घडले याबाबत तक्रारदार, सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र 2 यांचे समक्ष सविस्तर विचारले असता, त्यांनी सांगीतले की,'' मी, तक्रारदार यांचेसोबत गै.अ गौरव वानखेडे यांना 1000/- रू लाच रक्कम देणेकरीता गैरअर्जदार यांचे कार्यालयात गेलो असता, गै.अ. गौरव वानखेडे हे कागदपत्रांची झेरॉक्स काढण्याकरीता कार्यालयाचे खाली गेल्याचे तिथे हजर असलेल्या महिलेने सांगीतले. त्यांनतर त्या महिलेने गैरअर्जदार यांचे मोबाईलवर फोन लावुन तक्रारदार कार्यालयात आले असल्याचे सांगीतले तेव्हा तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांचे सोबत मोबाईल फोनवर बोलणी केली असता गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांना सध्याचे 1000 रुपये जमले आहे 1000 रुपये नंतर देईल असे बोलले तेव्हा गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांना खाली सलामे मॅडम कडे पैसे देवुन दया असे बोलल्याने तक्रारदार यांनी मी थांबतो गैरअर्जदार यांना मोबाईलचे वॉटसअँप ही समजावुन सांगवयाचे असल्याचे सांगीतले व काही वेळ आम्ही तिथेच थांबलो थोडया वेळाने गैरअर्जदार हे कार्यालयात आले तेव्हा गैरअर्जदार यांनी ईषा-याने तक्रारदार यांचेकडे पैष्याची मागणी केली तेव्हा तक्रारदार यांनी आपले षर्टचे डाव्या खिष्यातुन उजव्या हाताने पैसे काढुन गैरअर्जदार यांना पैसे दिल्यानंतर गैरअर्जदार यांनी आपले डावे हाताने पैसे घेवुन त्यांचे समोरील लाकडी ड्राव्हरमध्ये ठेवुन दिले त्यानंतर तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांचे कार्यालयाचे बाहेर निघुन सापळा अधिकारी श्री राहूल चव्हाण यांना गै.अ गौरव वानखेडे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत ईषारा केला. त्यावेळी सापळा पथक हजर येवून गै.अ श्री गौरव वानखेडे यांस पकडून ताब्यात घेतले.'' त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सुदधा विचारणा केली असता, त्यांनी पंच क्र 1 यांनी सांगीतलेल्या घटनेला दुजोरा देवुन सांगीतलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगीतले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचा समक्ष गैरअर्जदार गौरव वानखेडे यांना तक्रारदार यांचे जमाबंदीचे अर्जाचे कागदपत्रा बाबत विचारपूस केली असता त्यांनी एक रजिस्टर आमचे समक्ष सादर केला व त्या रजिस्टरचे आत मध्ये अर्जदार यांचा जमाबंदीचे अर्ज व त्यासोबत 100 रुपयाचा तक्रारदार यांचे नावाचा कोरा स्टॅम्प पेपर, घर टॅक्स पावती लावुन असलेला अर्ज आम्हास दिला व नमुद अर्जाची नोंद जमाबंदी रजिस्टर मध्ये सध्या घेण्यात आली नसल्याचे पंचासमक्ष सांगीतले. वरुन आम्ही पंचासमक्ष नमुद जमाबंदी रजिस्टरची पाहणी केली असता त्यांमध्ये तक्रारदार यांचे नावाची नोंद नसल्याचे दिसुन आले. वरुन आम्ही दोन्ही पंचा समक्ष तसेच रेकॉर्ड सेक्षन मधील निरीक्षक श्री.जागेष्वर पुंडलीकराव वानखेडे, यांचे समक्ष गैरअर्जदार श्री.गौरव वानखेडे यांचेकडुन तक्रारदार यांचे जमाबंदी अर्जाची व

संबधीत कागदपत्राची झेरॉक्स प्रती जप्ती पत्रका प्रमाणे जप्त केली.
त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर व्दारे तक्रारदार व गैरअर्जदार यांचे सापळा कार्यवाही दरम्यान झालेले संभाषण शांत वातावरणात ऐकुन त्याचे शब्दषः टिपण करणे असल्याने, तसेच गैरअर्जदार यांचे कार्यालयात गर्दी व गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याने पुढील कार्यवाही करीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, प्रषासकिय ईमारत क्रमांक 1 सिव्हील लाईन नागपूर, येथे करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. तसेच लाच रक्कम आरोपी श्री गौरव वानखेडे यांनी स्विकारली असल्याने, आरोपीस आम्ही शासकिय वाहनात बसवुन, सापळा पार्टीतील सदस्य व पंचासह ला.प्र.वि कार्यालयात पुढील कार्यवाहीकरीता घेवुन आलो.

ला.प्र.वि कार्यालय सिव्हील लाईन नागपूर येथे पोहचल्यानंतर गैरअर्जदार यांना तक्रारदाराकडून लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारल्याबाबत त्यांचे काय म्हणणे आहे?. याबाबत लेखी निवेदन लिहून देण्याकरीता सांगितले तसेच त्यांना कोरे कागपद व पेन त्यांना उपलब्ध करून दिला. यानंतर गैरअर्जदार गौरव वानखेडे यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरातील निवेदन आम्हास सादर केले. सदर निवेदनावर आम्ही व दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या. यानंतर आम्ही पोहवा आषीश वैदय यांना सुचना दिली की, सापळा कार्यवाही मध्ये तक्रारदार श्री रामेष्वर नंदनवार व गै.अ. गौरव वानखेडे यांचे दरम्यान व्हाईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेल्या संभाषणाचे लॅपटॉपवर शब्दषः स्क्रिप्ट तयार करावी. त्यावरून पोहवा आषीश वैदय यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले तक्रारदार व गैरअर्जदार श्री. गौरव वानखेडे यांचे संभाषणाची शब्दषः स्क्रिप्ट संगणकावर तयार केली

त्यानंतर सदर व्हाईस रेकॉडर मधील रेकॉर्ड फाईल क्र 261112-1633 या फाईलचे सेव्हनझा हॅष व्हॅल्यु कॅलक्युलेटरच्या सहायाने हॅष व्हॅल्यु काढण्यात आली असता फाईल क्र. 261112-1633 ची हॅष व्हॅल्यु 77F832531D569483BAF6FA61468B508DD अषी निर्माण झाली. सदर हॅष व्हॅल्यु चे प्रमाणपत्र तयार करून त्यावर दोन्ही पंचानी व आम्ही समक्ष म्हणून सहया करून सदर प्रमाणपत्र तपासाचे कागदपत्रात सलग्न केले.
यानंतर व्हाईस रेकॉर्डर मधील मुळ मेमोरी कार्ड बाहेर काढले. सदर SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 5411XV8711YY BM वर्णनाचे मेमोरी कार्ड एका प्लास्टीक केस मध्ये टाकून पाकीटात सुरक्षीत ठेवण्यात आले. सदर पाकीटावर प्रदर्ष P आणी Sअसे प्रदर्ष लिहुन व मेमरीकार्डचे विवरण लिहुन त्यावर आम्ही व दोन्ही पंचाच्या सही चे लेबल सदर पाकीटावर चिटकविण्यात आले व सदर पाकीटाला डिकांने चिपकवुन लाखेचे सिल लावून लिफापा सिलबंद करण्यात आला.

त्याचप्रमाणे आलोसे यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाच रक्कम हस्तगत करतेवळी व्हीडीओ रिकॉर्डींग करण्याकरीता वापरण्यात आलेला SanDisk 32 GB Micro SDHC Card serial no 5411XV8713FX BM मेमोरी कार्ड मधील VID20261112170857, VID20261112171123, VID20261112171155, VID20261112171229, VID20261112171306 या फाईल चे SEVENZA Hash Calculator या अप्लीकेषन स्वॉफ्टवेअर च्या MD5 Algorithm साह्याने हॅष व्हॅल्यु पडताळणी नंतर काढली असता हॅष व्हॅल्यु 66813D9BAF0786A301C3857EF46365F, 02B845E6B1557223E7E1 2703BA9C06C3, 37F9E572667070FFDC8B1920E61D50FC, AC8D24286626C5A12963AF241CAFED64, 6541A1713268D 5983031E96932B0C3F8 अषी निर्माण झाली असुन सदर मेमोरी कार्ड ला प्रदर्ष V देण्यात आले. सदर सापळा पडताळणी,सापळा कार्यवाही दरम्यान वारण्यात आलेले मेमोरी कार्ड मधील सक्रीप्ट व हॅष व्हॅल्यु, तसेच सापळा कारवाई दरम्यान मोबाईल व्दारे तयार केलेल्या चित्रीकरणाची हॅष व्हॅल्यु पोलीस अंमलदार प्रफुल भातुलकर यांनी तयार केली असुन त्याबाबत त्यांचे कलम 63 (4)(क) भा.सा.अधिनिय चे प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.
आरोपी लोकसेवक गौरव राजु वानखेडे वय 25 वर्श पद- कर संग्रहक, रेकॉर्ड सेक्षन,नागपूर महानगर पालीका नागपूर यांनी तक्रारदार यांचे राहते घराचे जमाबंदीचे रेकॉर्ड ची माहिती मिळणे करीता केलेल्या अर्जा संबधी लवकरात लवकर माहिती देण्याकरीता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे कडुन 2 हजार रुपयाची मागणी करुन दिनांक 12.11.2026 रोजी तक्रारदाराकडुन सापळा कार्यवाही दरम्यान 1 हजार रुपये लाच रक्कम पंच क्र. 01 समक्ष नागपूर महानगर पालीका नागपूर सिव्हील लाईन,नागपूर या कार्यालयातील दुसÚया मजल्यावरील आलोसे यांचे कक्षात स्वीकारली. त्यांचे हे कृत्य कलम 7 भश्ट्राचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारणा 2018) प्रमाणे होत असल्याने नमुद गैरअर्जदार यांचे विरुध्द माझी सरकार तर्फे कायदेषिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PAWAN ashok BHINGARDIVE(SI (Sub-Inspector)) / PCMAH91977

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the (If known / seen)**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष)	Build (बांधा)	Height (cms.) (उंची(सें. मी.))	Complexion (रंग)	Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)